
दादागिरी




दादागिरी



दादा कसं बनावं?

दादा बनल्यावर
तुम्हाला इतरांना
चिडवण्याचा आनंद
घेता येतो....



तुम्ही त्यांच्याशी उद्धटपणे बोलू-
वागू शकता....



तुम्ही त्यांना जाड्या, सुकड्या, टिंगण्या, बाळ्या.....अशा
नावांनी हाक मारू शकता.

तुम्ही लोकांच्या नकला करू शकता....



त्यांना छळू शकता....




त्यांना इजा करू शकता....



....त्यांना काहीही करून रडवू शकता.



त्यांच्या वस्तू लुबाडू शकता....



त्यांच्या वस्तुंशी खेळू शकता....



ज्या गोष्टी करायला लोक
घाबरतात, त्या गोष्टी करायला
त्यांना भाग पाडू शकता....



ज्या गोष्टी करायला तुम्ही घाबरता,
त्या गोष्टी करायला लोकांना भाग पाडू शकता....


लोकांना किळस वाटणाऱ्या गोष्टी करायला लावू शकता....



ते बावळट दिसतील अशा गोष्टी करायला लावू शकता....



लोकांना चोरी करायला भाग पाडू शकता....



त्यांना इतर लोकांवर *दादागिरी* करण्यास भाग पाडू शकता




काळजी घ्या!



मात्र एवढी काळजी घ्या! तुमच्यापेक्षा....
लहान दिसणाऱ्या मुलांना धरा.
लहान वयाच्या मुलांना धरा.

शहरात नवीनच आलेल्या आणि ज्यांना कुणी मित्र नाहीत, अशा मुलांपासून सुरुवात करा.




विशेषत: जे *वेगळे* आहेत, त्यांना धरा. त्यांच्या चेहऱ्यावरून किंवा बोलण्यावरून त्याचं वेगळेपण तुम्ही सहज ओळखू शकाल.

त्यांची ताकद तुमच्यापेक्षा कमी आहे, हे बघा.
त्यांच्यासोबत त्यांचं रक्षण करणारं कुणी नाही, हे बघा.



ते ही गोष्ट मोठ्यांना सांगणार नाहीत, हे बघा.



“कुणाला सांगितलंस, तर तुझी खैर नाही,”
अशी धमकी त्यांना द्या.

तुमच्यापेक्षा मजबूत आणि वयाने मोठ्या असलेल्या लोकांशीही तुम्ही दादागिरी करू शकता.
अगदी शिक्षकांशीसुद्धा!
“याला वर्गातली मुलं नीट सांभाळता येत नाही,” असं कुणी म्हटलेलं शिक्षकांना आवडत नाही.



वर्गातील मुलं तुम्हाला पाठिंबाच देतील, कारण शिक्षक तुमच्याविरुद्ध आहेत.

टोळक्याचा पुढारी

दादा बनण्यासाठी मोठं असण्याची गरज नाही.
चलाख बना.
तुमचं काम दुसऱ्यांकडून करून घ्या.
मोठ्यांची मदत घ्या.
तुमच्याकडे आदराने पाहातात अशा तरुणांची किंवा कमी चलाख असलेल्या लोकांची निवड करा,




आता तुम्ही टोळक्याचे पुढारी बनलात.

टोळक्यातील लोकांना तुम्ही तुमच्या ताब्यात ठेवा.
कधीकधी त्यांची स्तुती करत जा.
कधीकधी लूट आणि त्यातील मजा त्यांच्याशी वाटून घेत जा.
याचा फायदा तुम्हाला तेव्हा होईल,
जेव्हा कुणी तुमची वेडीवाकडी कागाळी त्यांच्याकडे करेल.



अशी पुरेशी मूर्ख मंडळी एकदा जमली
की ते तुम्हाला खुश करण्यासाठी,
तुमच्या प्रशंसेला पात्र ठरण्यासाठी
काही ना काही प्रयत्न सतत करत राहातील.

ते सर्व तुमच्यासारखेच कपडे घालण्याचा,
तुमच्यासारखेच दिसण्याचा प्रयत्न करतील. ,



जर तुम्ही पकडले गेलात तर!

तुम्ही पकडले गेलात तर काय करायचे?
म्हणा, “त्याने आधी सुरू केलं. विचारा कुणालाही,”
किंवा म्हणा,
“आम्ही तर एक खेळ खेळत होतो.”




आपली कातडी बचावण्यासाठी
काहीही करा.
रडा, आक्रोश करा,
“मला माहीत नव्हतं. मी परत असं कधी
करणार नाही.”



दादा बनण्यात खरंतर काही मजा नसते.

दादागिरी करण्यात काही मजा नसते.
इतरांना तर त्याचा त्रासच होतो.




कुणीच तुम्हाला पसंत करत नाहीत....
अगदी तुमच्या टोळक्यातील लोकसुद्धा!
ते तुमच्या भीतीने काही बोलत नाहीत, एवढंच!

तुम्ही पकडले गेलात तर
हे सगळे तुमची साथ सोडतील,
तुम्हाला टाळतील,
तुमच्याबद्दल वाईट-साईट बोलतील.
दादाशी दादागिरी करायची संधी कोण सोडेल!



मग तुम्ही स्वत:च्याच नजरेतून उतराल.
तुमचा आदर करतील असे मित्र
तुम्हाला हवेसे वाटू लागतील,
पण कुणीही तुमच्याशी मैत्री करणार नाही.



काही लोकांना तुमच्याबद्दल वाईटसुद्धा वाटत असेल.


तुम्ही *दादा* का बनलात?

काही लोकांना हा वारसा म्हणून मिळतो. ते जन्मत:च *दादा* असतात.



कदाचित, मूल तान्हं होतं तेव्हा रडल्यावर सगळे आपल्याकडे लक्ष देतात, हे शिकलं असेल. जी मुलं घरात आपले हट्ट पुरवून घेतात, ते बऱ्याचदा शाळेत हट्ट पूर्ण झाले नाहीत तर *दादा* बनतात.

कधीकधी याच्या अगदी उलट होतं.
काहींच्या घरात त्यांचे बहीण-भाऊ आणि अगदी आई-वडीलसुद्धा दादागिरी करत असतात.



ज्या मुलांच्या घरी दादागिरी चालते, ते बऱ्याचदा हेच शिकतात की आपल्याला हवे ते मिळवण्यासाठी *दादागिरी* हा एकमेव मार्ग आहे.

दादा माणूस मनाने कमकुवत असतो.



पण कधीकधी त्यांच्यासमोर कुणी आव्हान ठोकून उभे राहिले नाही, तर ते सत्तेच्या सर्वोच्च पदावर पोहोचतात.
मग त्यांना “आपण खरोखरच सर्वश्रेष्ठ आहोत आणि इतर लोकांनी आपलं सगळं ऐकलं पाहिजे,” असे वाटू लागते.
ते दादागिरीलाच *नेतृत्व* मानू लागतात आणि दादागिरी करणाऱ्या, आपल्या हो ला हो म्हणणाऱ्या लोकांच्या गराड्यात राहू लागतात.
दादागिरी करणारे राष्ट्रीय नेते लोकांची दिशाभूल करतात.
ते युद्ध सुरू करू शकतात.
बऱ्याचदा त्यांचे आक्रमक शत्रुच त्यांची सत्ता उलथवून टाकतात.

खरा आदर आणि प्रेम मिळवणं फार कठीण असतं. खऱ्या नेत्याला त्याच्या मर्यादांचे भान असते. त्यामुळे तो इतरांचा आदर करतो.

खरा नेता दादागिरीला तोंड देताना कुठलाच पर्याय उरला नाही तरच युद्धाचा पर्याय निवडतो. त्यावेळी मात्र तो अतुलनीय धैर्य आणि निग्रह दाखवून अखेरपर्यंत लढत राहातो.

आपणही कधीकधी हवं ते मिळवण्यासाठी *दादागिरी* करतो.



दादागिरी करणारे आपमतलबी असतात.

तुम्ही दादागिरी करता?

दादागिरीला प्रोत्साहन देता?

कुणाच्या तरी दादागिरीने त्रस्त होता?

मग हे पुस्तक तुमच्याचसाठी आहे.

लोक दादागिरी का करतात,

त्यांच्याशी कसं वागावं,

हे या पुस्तकातून शिकायला मिळतं.

